**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.४ याची जबानी**

मी याव्दारे शपथपूर्वक कथन करतो की,

माझे नाव – किसन बाबुराव सानप

माझे वय ३८ वर्षे व्यवसाय पोलीस कॉन्स्टेबल.

राहणार कोपरगाव तालुका पोलीस ठाणे, ता.कोपरगाव, जि.अहमदनगर

**अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी वकील श्रीमती के.आर.उतळे यांचेमार्फत.**

**१.** दिनांक ०२.०८.२०२० रोजी मी अकोले पोलीस ठाणे येथे पोलीस कॉन्स्टेबल या पदावर कार्यरत होतो. त्या दिवशी पोलीस निरीक्षक श्री.जोंधळे यांनी मला तसेच पो.ना.गोराणे, पो.कॉ.वलवे व पो.कॉ.पर्बत यांना त्यांचे कॅबीनमध्ये बोलावून सांगितले की, गणोरे गावाचे शिवारामध्ये आढळा नदीच्या काठावर काही इसम ट्रॅक्टरमध्ये अवैधरित्या वाळू भरीत आहेत, अशी माहिती मिळाली असून तुम्ही तेथे जावून कारवाई करा. त्यानंतर आम्ही सर्वजण खाजगी वाहनाने संध्याकाळी १८.०५ वाजताचे सुमारास गणोरे येथे आढळा नदीजवळ गेलो. आम्हाला आढळा नदीच्या पुलावर समोरून एक ट्रॅक्टर येताना दिसला. त्या ट्रॅक्टरला विना नंबरची ट्रॉली जोडलेली होती. आम्ही त्या ट्रॅक्टर चालकाला थांबण्याचा इशारा केला. परंतु, तो थांबला नाही. त्या ट्रॅक्टर चालकाने तो ट्रॅक्टर थोडे पुढे जावून रस्त्याच्या कडेला थांबविला व तो ट्रॅक्टर चालक झाडाझुडुपात पळून गेला. आम्ही तेथे जावून त्या ट्रॅक्टर व ट्रॉलीची पाहणी केली. तो ट्रॅक्टर लाल रंगाचा होता. त्या ट्रॅक्टरला क्रमांक नव्हता. त्या ट्रॅक्टरच्या ट्रॉलीमध्ये सुमारे एक ब्रास वाळू, तीन लोखंडी फावडे व पाच फायबरच्या पाट्या होत्या. आम्ही चौकशी केली असता त्या ट्रॅक्टरचा चालक सत्यवान किसन मोरे, रा.गणोरे हा असल्याचे समजले. आम्ही तो ट्रॅक्टर व ट्रॉली त्यातील वाळू व इतर साहित्य या सह एका खाजगी चालकाच्या मदतीने अकोले

पोलीस ठाणे येथे आणले. मी घडलेल्या घटनेबाबत फिर्याद दाखल केली. आता मला ती फिर्याद दाखविली. ती फिर्याद तीच आहे. त्या फिर्यादीवर माझी सही आहे. ती सही मी ओळखतो. त्या फिर्यादीतील मजकूर खरा व बरोबर आहे. त्या फिर्यादीस **निशाणी पी–२०** देण्यात आली. त्या फिर्यादीनुसार प्राथमिक खबरी अहवाल नोंदविला. आता मला तो अहवाल दाखविला. तो अहवाल तोच आहे. त्या अहवालावर माझी सही आहे. ती सही मी ओळखतो. त्या अहवालातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्या अहवालास **निशाणी पी–२१** देण्यात आली. मी आरोपीला पाहिल्यास ओळखू शकतो. आजरोजी आरोपी न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.एस.डी.पोखरकर यांचे मार्फत–**

२. पोलीस निरीक्षक श्री.जोंधळे यांनी आम्हाला कारवाई करणेबाबत लेखी आदेश दिलेला नव्हता. आम्हा गेलो त्या खाजगी वाहनाचा क्रमांक व त्याच्या मालकाचे नाव मला सांगता येणार नाही. त्या ट्रॅक्टर, ट्रॉली व त्यातील वाळूचे व इतर साहित्यांचे फोटो काढले होते किंवा कसे, हे मला आठवत नाही. आम्ही तो मुद्देमाल पोलीस ठाण्यात जमा केला होता. वाळू असलेला ट्रॅक्टर व ट्रॉली आम्ही जप्त केली होती. एक ब्रास म्हणजे किती, हे मला सांगता येणार नाही.

३. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी आम्हाला आढळा नदीपात्रात वाळू भरीत असताना मिळून आलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, गणोरे येथील नदीच्या शेजारी त्या गावची स्मशानभूमी आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या गावातील मयत व्यक्तींचे अंत्यविधी त्या स्मशानभूमीत होतात. त्या स्मशानभूमीमध्ये गावातील लोकांची ये–जा असते किंवा कसे, हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्या स्मशानभूमीमध्ये एखाद्या व्यक्तीचा अंत्यविधी करणेसाठी तत्पूर्वी ट्रॅक्टरमधून

लाकडे वगैरे साहित्य तेथे पोहोचवावे लागते.

४. हे म्हणणे खरे आहे की, गौण खनिजासंदर्भात कारवाई करण्याचे अधिकार महसूल अधिकारी यांना असतात. आम्ही छाप्याला जाण्यापूर्वी कोणत्याही महसूल अधिका–याला त्याबाबत माहिती दिलेली नाही.

५. हे म्हणणे खरे आहे की, मी गणोरे बीटला असल्यामुळे माझे त्या गावामध्ये नेहमी जाणे–येणे असायचे. हे म्हणणे खरे आहे की, गणोरे येथील लोकांशी माझा कामानिमित्त संबंध आलेला होता. हे म्हणणे खरे नाही की, गणोरे गावातील काही लोकांच्या मदतीने आरोपीला त्रास देण्यासाठी मी त्यांचेविरुध्द ही खोटी फिर्याद दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही आरोपीच्या ताब्यातून कोणताही ट्रॅक्टर, ट्रॉली, वाळू, फावडे व पाट्या जप्त केलेल्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, वरिष्ठांच्या सांगण्यावरून मी आरोपीविरुध्द खोटी फिर्याद दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात केलेली सर्व कथने खोटी आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी याकामी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण. फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत
सदरचा जबाब माझे समक्ष नोंदविणेत आला.

DHIRAJ MARUTI HINGLAJKAR
Digitally signed by DHIRAJ MARUTI HINGLAJKAR
Date: 2026.01.31 17:30:16 +0530

**(डी.एम.हिंग्लजकर)**
**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अकोले,**
**ता.अकोले, जि.अहमदनगर**

**दिनांक – ३१.०१.२०२६**